# University of Mumbai

क्र.शिनिमावि(विशि) / आयसीडी / २०१९–२० / ७१

परिपत्रक:—

विद्यापीठाच्या विविध विभागांचे संचालक / विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी / ठाणे उपकेंद्र, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र यांना कळविण्यात येते की, सोबत सांख्यिकी कक्ष यांचे पत्र क्र.UDSTAT/ICD/2018-19/165 of 2019, दिनांक २२ मार्च, २०१९ जोडले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने आपल्या विभागाशी संबधित माहिती सांख्यिकी विभागास परस्पर देण्यात यावी.

मुंबई : ४०० ०३२
दिनांक: एप्रिल, २०१९

(दत्ता घुगे)
उपकुलसचिव
शिनिमावि(विशि)

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागाचे संचालक / विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी / ठाणे उपकेंद्र, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र.

University of Mumbai

दुरध्वनी क्र. ०२२-२२७० ८७३८
०२२-२२६१ ८९८७
Email : supt.statunit@gmail.com

सांख्यिकी कक्ष
खोली क्र २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई - ४०० ०३२.

No. UDSTAT/ICD/2018-19/ 165 of 2019

दिनांक : २२ मार्च, २०१९

प्रति,

१) संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.

२) उपकुलसचिव,
संलग्नता व मान्यता विभाग,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२.

३) उपकुलसचिव,
शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२.

४) उपकुलसचिव,
विशेष कक्ष,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२.

५) उपकुलसचिव,
नाव नोंदणी विभाग,
डॉ. आंबेडकर भवन,
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.

६) उपकुलसचिव,
पदवीपूर्व/पदव्युत्तर विभाग,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२.

मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली, यांच्यामार्फत दरवर्षी देशातील सर्व विद्यापीठाकडून विविध स्वरूपाची माहिती ऑनलाईन मागविण्याकरीता AISHE (All India Survey on Higher Education ) Programme तयार केलेला आहे. तसेच संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी देखील MIS (Management Information System) ऑनलाईन प्रोग्राम तयार केलेला असून सर्व विद्यापीठातील विभाग, संलग्नित महाविद्यालये/संस्था यांना माहिती भरणे अनिवार्य आहे.

तसेच विद्यापीठाला शासनास व विविध प्राधिकरणांस आवश्यक असलेली माहिती वेळोवेळी तयार करावी लागते. त्यासाठी सांख्यिकी कक्षाने Students on Roll हा ऑनलाईन प्रोग्राम तयार केलेला असून सर्व विद्यापीठ विभाग, संलग्नित महाविद्यालये/संस्था यांच्याकडून संचालकांच्या आदेशानुसार माहिती ऑनलाईन स्वरूपी संकलित केली जाते. त्याकरीता परिपत्रके, स्मरणपत्रके, ईमेल तसेच दुरध्वनी/भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून माहिती संकलित केली जाते.

# University of Mumbai

-२-

परंतु अनेक विद्यापीठ विभाग, संलग्नित महाविद्यालये/संस्था सदरची अपेक्षित माहिती विहित वेळेत सादर करत नसल्यामुळे शासनाच्या वरीष्ठ अधिका-यांनी तीव्र नाराज़ी व्यक्त केलेली असून संबंधित अर्थिक सहाय्य स्थगित करण्याबाबत कार्यवाही का करू नये ? अशी विचारणा करण्यात आलेली आहे.

सदर बाब सांख्यिकी कक्षाने टिपंणीद्वारे मा. कलगुरूंच्या निदर्शनास आणल्यामुळे कुलगुरूंनी सदर विद्यापीठ विभाग, महाविद्यालये/संस्था यांनी माहिती सादर न केल्यास विद्यापीठ विभाग व महाविद्यालये/संस्था यांची आपल्या विभागाशी संबंधित असलेली कामे सांख्यिकी कक्षाकडून ना-हरकत पत्र प्राप्त झाल्याशिवाय स्विकारू नयेत, अशाप्रकारचे आदेश दिलेले आहेत.

तरी सदर बाब लक्षात घेता, प्रत्येक चालू शैक्षणिक वर्षाकरीता आपल्या विभागाने याची नोंद घेवून सोबत असलेल्या ना-हरकत पत्र असल्याशिवाय विद्यापीठ विभाग व महाविद्यालये/संस्था यांची आपल्या विभागाशी संबंधित असलेली कामे करू नयेत व त्याबाबत विद्यापीठ विभाग व महाविद्यालये/संस्था यांना परिपत्रकाद्वारे कळविण्याची व्यवस्था करावी व त्याचप्रमाणे परिपत्रकाची एक प्रत सांख्यिकी कक्षाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

सोबत :- प्रमाणपत्र/हमीपत्र

सांख्यिकी कक्ष, फोर्ट
खोली क्र. २०२

## AISHE & Students on Roll
## प्रमाणपत्र/हमीपत्र
## शै. व. २०१८-१९

दिनांक :

असे प्रमाणित करण्यात येते की, आपण दिलेल्या प्र-पत्राच्या वहित नमुन्या प्रमाणे संकलित केलेली माहिती रकान्यानुसार खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | विषय व संकेतस्थळ | परिपत्रक क्रमांक | माहिती भरली आहे / नाही | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी संख्या माहिती (Students on Roll) शै. व. २०१८-१९ www.eoffice.mu.ac.in/statistical | No.UDSTAT/ICD/2018-19/92 of 2018, Dt. 15th October, 2018 | | रकान्यात नमूद केलेले सर्व संबंधित ऑनलाईन माहिती विषयीची शै. व. २०१६-१७ व २०१७-१८ बाबतचे सदर कक्षातील प्राप्त झालेले हमीपत्र/प्रमाण पत्राची प्रत सोबत पडताळणीसाठी घेऊन येणे. (त्याचप्रमाणे शै. व. २०१८-१९ संबंधित प्रमाणपत्राच्या मुळ दोन प्रती सोबत घेऊन येणे.) |
| २. | अखिल भारतीय उच्च शिक्षण संस्था (AISHE) शै. व. २०१८-१९ www.aishe.gov.in | No.UDSTAT/ICD/2018-19/107 of 2018, Dt.7th December, 2018 | | |
| ३. | व्यवस्थापकीय माहिती पद्धत शै. व. २०१८-१९ (MIS) dhemis.maharashtra.gov.in | No.UDSTAT/ICD/MIS/2018-19/82 of 2018, Dt.3rd October, 2018 | शै. व. २०१८-१९ या वर्षासाठी घेतलेल्या प्रमाणपत्राची एक छायांकित प्रत सोबत पडताळणीसाठी घेऊन येणे. | |

उपरोक्त रकान्यानुसार दर्शविल्याप्रमाणे पोर्टलवर भरलेली अत्यावश्यक माहिती परीपूर्ण व अचूक आहे. संबंधित माहितीमध्ये काही त्रुटी आढळल्यास महाविद्यालयाचा/संस्थेचा प्राचार्य/प्रमुख या नात्याने मी सर्वस्वी जबाबदार राहीन, याची मी ग्वाही देतो/देते.

Contact:-__________
Email Address:-__________

संचालक/विभाग प्रमुख/प्राचार्य
(नाव, सही व शिक्का)

## कार्यालयीन कामकाजाकरीता

__________ महाविद्यालयाची AISHE, MIS व STUDENT ON ROLL शैक्षणिक वर्ष **२०१८-१९** या वर्षाची माहिती सांख्यिकी कक्षाकडे प्राप्त झालेली असून सदर महाविद्यालयांचा परिक्षा अर्ज/नोंदणी अर्ज, महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extention)/प्राचार्य/शिक्षकमान्यता (Approval) स्विकारण्यास तसेच जाहिरातमुसदा व बिंदूनामावली तपासण्यास हरकत नाही.

नोडल अधिकारी,
(AISHE/MIS Cell)